अखिल भारतीय सेवेतील व राज्य शासनाच्या सेवेतील तसेच सार्वजनिक उपक्रम, मंडळे, महामंडळे इत्यादींच्या अधिकारी/पदाधिकारी यांच्या दौ-याबाबत.

महाराष्ट्र शासन
सामान्य प्रशासन विभाग
शासन परिपत्रक क्र. : सीडीआर-१०९६/८७/प्र. क्र. ४/९६/११,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२.
दिनांक : २७ ऑक्टोबर, १९९७

वाचा :- १] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र. ४/९६/११, दिनांक ६ एप्रिल १९९६
२] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र. ४/९६/११, दिनांक २४ ऑक्टोबर १९९६.
३] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र. ४/९६/११, दिनांक ३१ डिसेंबर १९९६.
४] शासन पत्र, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र. ४/९६/११, दिनांक ११ एप्रिल १९९७.
५] शासन परिपत्रक, सामान्य प्रशासन विभाग, क्रमांक सीडीआर-१०९६/८७/प्र.क्र. ४/९६/११, दिनांक ११ ऑगस्ट १९९७.

शासन परिपत्रक

संदर्भाधीन परिपत्रकान्वये परदेश दौ-याच्या प्रस्तावांची छाननी करुन असे प्रस्ताव स्वयंस्पष्ट टिप्पणीसह तसेच तपासणी सूचीतील माहितीसह सादर करण्यात यावेत असे सूचित करण्यात आले आहे. परदेश दौ-याचा प्रस्ताव सामान्य प्रशासन विभाग, वित्त विभाग व शिफारस समितीपुढे सादर करताना खालील मुद्यांबाबतची माहितीही प्रस्तावासोबतच्या स्वयंस्पष्ट टिप्पणीत न चुकता देण्यात यावी.

१] सदर दौरे शासनास कितपत फायदेशिर होतात याचा पूर्ण अभ्यास करावा व अधिकारी दौ-यावरुन परत आल्यानंतर शासनाच्या कामांची उत्पादकता किंवा कार्यक्षमता वाढविण्याचे दृष्टीने काय करतात याची अंमलबजावणी करावी.

२] काही विभागाकडून परदेशी कंपनीच्या करारावावत परदेशी दौरे अंतर्भूत असतात हे [illegible] आवश्यक व फायदेशिर असते का याची तपासणी करावी.

३] जे अधिकारी सेवानिवृत्तीला आलेले आहेत अशा अधिका-यांना पुरस्कृत केले जाते तेव्हा ते शासनाची उत्पादकता व कार्यक्षमता वाढविण्यास योगदान देवू शकतील का याचीही तपासणी करावी. शिफारस समितीपुढे सादर करावयाचे प्रस्ताव उप सचिव,

[ कृ. मा. प. ]

का. क्र. ११, सामान्य प्रशासन विभाग ह्यांच्याकडे पाठविण्यात यावेत.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

[ज. द. ठाकूर]
अवर सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रति,

राज्यपालांचे सचिव,
मुख्यमंत्री यांचे सचिव,
उप मुख्यमंत्री यांचे सचिव,
सर्व मंत्री व राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव/स्वीय सहाय्यक,
शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [मूळ शाखा], मुंबई,
* प्रबंधक, उच्च न्यायालय [अपील शाखा], मुंबई,
* प्रबंधक, लोकआयुक्त व उप लोकआयुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान सभा सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र विधान परिषद सचिवालय, मुंबई,
* सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई,
* सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय, मुंबई ३२, का. क्र. 10, 12, 31, २१, १९ व ३० [र. नि.]
इतर मंत्रालयीन विभाग

* पत्राने.